दिनांक  10/11/2022 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 83

विषय – विटा नगरपरिषद घनकचरा व्यवस्थापन कार्यप्रणालीचे थ्री.डी.मॉडेल तयार करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- दिनांक 01/11/2022 ने आरोग्य निरिक्षक व मुख्याधिकारी यांचे मंजूर टिपणीनुसार.

विटा शहराने मागील पाच वर्षात स्वच्छ सर्वेक्षणमध्ये उल्लेखनीय कामगिरी  केली आहे. तसेचस्वच्छ सर्वेक्षण 2021 मध्ये संपूर्ण देशात प्रथम क्रमांक व स्वच्छ सर्वेक्षण 2022 मध्ये पश्चिम भारतात दुसरा क्रमांक प्राप्त झाला आहे.

विटा  शहराचा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प संपुर्ण महाराष्ट्रामध्ये उत्कृष्ट मॉडेल असून सदरचा प्रकल्प पाहणेसाठी संपुर्ण महाराष्ट्रातून नगरपालिका व महानगरपालिकेचे अधिकारी, पदाधिकारी तसेच विटा शहरातील शाळा, महाविद्यालयांचे विदयार्थी, शिक्षक तसेच नागरिक भेट देत असतात. सदर घनकचरा व्यवस्थापन कार्यप्रणालीचे मॉडेल तयार करून नगपरिषद कार्यालयामध्ये ठेवलेने संपूर्ण प्रकल्पाची माहिती देण्यात सोईस्कर होणार आहे. तसेच शासनाने राबविलेल्या विविध प्रदर्शनामध्ये सदर मॉडेलची मांडणी करणे उपयुक्त  ठरणार आहे.

तरी विटा नरपरिषद घनकचरा व्यवस्थापन कार्यप्रणालीचे थ्री.डी.मॉडेल तयार करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा